# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १८/०४/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३१६** **विषय क्रमांक –३१६**

**दिनांक- १८/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१६**<br>**दिनांक-१८/०४/२०२३** | मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. विमुका/५/कावि/१२७/२०२३ दि.२१/३/२०२३ अन्वये ऑटो कल्स्टर येथील कोविड -१९ रूग्णालयाचे नुतनिकरण करणे व चालन देखभाल व दूरूस्ती करणे कामाचे अंदाजपत्रकास मा. महापालिका सभेची कार्योत्तर प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत. |
| **ठराव क्र. ३१६**<br>**दिनांक-१८/०४/२०२३** | मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. विमुका/५/कावि/ १२७/२०२३ दि.२१/३/२०२३ अन्वये, निविदा क्र.५६/०१/२०२१-२२ नुसार निविदा मागविणेत आलेल्या आहेत. सदर निविदा दि.२/०२/२०२२ रोजी उघडल्या असून त्यामध्ये मे. ग्रीन लिंक इन्फ्रा हे (२३.०१%) कमी लघुत्तम दर धारक आहेत. ऑटोक्लस्टर येथील कोविड -१९ रूग्णालयाचे नुतनिकरण करणे व चालन देखभाल व दुरूस्ती करणे कामाकरीता अंदाजपत्रक तयार करणेत आले होते, तथापि अचानक बदललेल्या परिस्थिती नुसार कामात बदल झाला आहे, त्यानुसार केलेल्या कामा प्रमाणे सुधारीत तांत्रिक मान्यता घेणेत आलेली आहे. सद्य परिस्थितीत सदरचे रूग्णालय पुर्ण पणे बंद करून ते ऑटोक्लस्टर संस्थेला परत हस्तांतरीत करणेत आले आहे. तथापी कोवीड १९ ची पुन्हा लाट येणार त्या दृष्टीने केलेली पुर्व तयारी व नंतर सर्व यंत्रणा काढुन घेण्याचे व सदरचे सर्व साहित्य विभागाकडे स्थलांतरीत करून हस्तांतरीत करण्याचे काम मे. ग्रीन लिंक इन्फ्रा. ह्या सर्वात कमी दर दिलेल्या एजन्सी कडून करून घेण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च मे. ग्रीन लिंक यांना अदा करणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष केलेल्या कामाप्रमाणे र.रू. १७,३३,३५१/- चे अंदाजपत्रकास र.रू. २०,४५,३५४/- इतकी सुधारीत तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. तितक्याच र.रू. २०,४५,३५४/- चे अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचे काम हे आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व भारतीय साथ रोग अधिनियम १८९७ मधील तरतूदी नुसार कोविड -१९ चे कामकाज असल्याने सदर कामाचा खर्च कोरोना निधी ह्या लेखा शिर्षावर करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३१७** **विषय क्रमांक –३१७**

**दिनांक- १८/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१७**<br>**दिनांक-१८/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४२८/२०२३ दि.१७/४/२०२३ अन्वये, मौजे बोऱ्हाडेवाडी येथील I to R अंतर्गत मनपाच्या ताब्यात आलेल्या सुविधा भुखंडावर कचरा स्थानांतरण केंद्र बांधणेबाबत. |
| **ठराव क्र. ३१७**<br>**दिनांक-१८/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/४२८/२०२३ दि.१७/४/२०२३ अन्वये,मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना क्र. स्था/नि/बीआरटीएस/४३/२०२२, दि.१७/०१/२०२२ अन्वये कामाचा कार्यारंभ आदेश स्थापत्य विभागातर्फे देणेत आला होता. या कार्यारंभ आदेशान्वये कचरा संकलनासाठी पुढील तीन ठिकाणी ट्रान्सफर स्टेशन उभारणेचे स्थापत्य विषयक काम करणेचे नियोजन होते.<br>१) कासारवाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्राजवळील ट्रान्सफर स्टेशन<br>२) सांगवी स्मशानभुमीजवळ ट्रान्सफर स्टेशन<br>३) थेरगांव येथील एमएम शाळेजवळील चिंचवड पुलाजवळ ट्रान्सफर स्टेशन<br><br>यापैकी, क्र. १, कासारवाडी येथील मैलाशुद्धीकरण केंद्राजवळील ट्रान्सफर स्टेशन उभारणेचे काम झालेले असून त्याचे उद्घाटन मा. पालकमंत्री, पुणे यांचे हस्ते दि.१९/०३/२०२३ रोजी झाले आहे व अ. क्र. ३, थेरगांव येथील एमएम शाळेजवळील चिंचवड पुलाजवळ कचरा संकलनासाठी ट्रान्सफर स्टेशन उभारणेचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.<br><br>उर्वरित क्र. २, सांगवी स्मशानभुमीजवळ ट्रान्सफर स्टेशन बांधणेसाठीची प्रस्तावित जागा जलसंपदा विभागाची असून त्यांनी या जागेवर कायमस्वरुपी बांधकाम करणेस मनाई केली आहे. त्यामुळे, या ठिकाणी ट्रान्सफर स्टेशन बांधणेचे काम करता येऊ शकत नाही. त्यामुळे, त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.<br><br>मौजे बोऱ्हाडेवाडी येथील स. नं. २२७ पै,२२८ पै व २३० पै येथील I to R अंतर्गत सुमारे ५००० चौमी. क्षेत्राचा भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात आलेला आहे. सदर भुखंडाची पाहणी पर्यावरण विभाग, आरोग्य विभाग, प्रभाग अधिकारी ‘क’ क्षेत्रिय कार्यालय तसेच मा. अति. आयुक्त-२ यांचे समवेत करणेत आली. सदर स्थळ पाहणीवेळी सर्वांनी सदर ठिकाणी कचरा स्थानांतरण केंद्र बांधणेसाठी सदरची जागा योग्य असलेबाबत मत दिलेले आहे.<br><br>उपरोक्त कामाअंतर्गत बांधणेत येणारे सांगवी येथील कचरा स्थानांतरण केंद्र मौजे बोऱ्हाडेवाडी येथील स. नं. २२७ पै, २२८ पै व २३० पै मधील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या सुविधा भुखंडावर बांधणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर निविदेमधील प्रस्थावित सांगवी येथील कचरा संकलन केंद्र हे मौजे बोऱ्हाडेवाडी येथील स. नं. २२७ पै, २२८ पै व २३० पै मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील जागेवर बांधणेकरीता मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३१८** **विषय क्रमांक –३१८**

**दिनांक- १८/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१८<br>दिनांक-१८/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. स्था/प्रकल्प/४२९/२०२३ दि.१७/४/२०२३ अन्वये, मौजे आकुर्डी येथील I to R अंतर्गत मनपाच्या ताब्यात आलेल्या सुविधा भुखंडावर कचरा स्थानांतरण केंद्र बांधणेबाबत. |
| **ठराव क्र. ३१८<br>दिनांक-१८/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. स्था/प्रकल्प/४२९/२०२३ दि.१७/४/२०२३ अन्वये, मे. कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना क्र. स्था/नि/बीआरटीएस/४२/२०२२, दि.१७/०१/२०२२ अन्वये कामाचा कार्यारंभ आदेश स्थापत्य विभागातर्फे देणेत आला होता. या कार्यारंभ आदेशान्वये कचरा संकलनासाठी पुढील दोन ठिकाणी ट्रान्सफर स्टेशन उभारणेचे स्थापत्य विषयक काम करणेचे नियोजन होते.<br>१) गवळीमाथा येथील ट्रान्सफर स्टेशन<br>२) निगडी सेक्टर क्र. २३ येथील गायरान जागेमधील ट्रान्सफर स्टेशन<br><br>यापैकी, क्र. १, गवळीमाथा येथील ट्रान्सफर स्टेशन उभारणेचे काम झालेले असून त्याचे उद्धाटन मा. पालकमंत्री, पुणे यांचे हस्ते दि.१९/०३/२०२३ रोजी झाले आहे. तसेच, या कामातील दुसरे कचरा स्थानांतरण केंद्र मौजे निगडी येथील गायरान जागेवर प्रस्तावित होते. या ठिकाणी काम चालू केले असता स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर विरोध केला. त्यामुळे, सदरचे काम बंद ठेवावे लागले. त्यानंतर पर्यायी जागा म्हणुन स. नं. २३ येथील उद्यानाच्या जागेत कचरा स्थानांतरण केंद्र बांधणेचे नियोजन करणेत आले. परंतू, तेथेही विरोध झालेने पुन:श्च काम बंद करावे लागले.<br><br>मौजे आकुर्डी येथील स. नं. १४७ पै येथील I to R अंतर्गत सुमारे १६०६.४४ चौमी. क्षेत्राचा भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात आलेला आहे. सदर भुखंडाची पाहणी आरोग्य विभाग, क्षेत्रिय अधिकारी ‘अ’ क्षेत्रिय कार्यालय तसेच मा. अति. आयुक्त-२ यांचे समवेत करणेत आली. सदर स्थळ पाहणीवेळी सर्वांनी सदर ठिकाणी कचरा स्थानांतरण केंद्र बांधणेसाठी सदरची जागा योग्य असलेबाबत मत दिलेले आहे.<br><br>उपरोक्त कामाअंतर्गत बांधणेत येणारे निगडी येथील गायरान जागेवरील कचरा स्थानांतरण केंद्र मौजे आकुर्डी येथील स. नं. १४७ पै मधील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या सुविधा भुखंडावर बांधणे आवश्यक आहे त्यानुसार निविदेमधील प्रस्तावित निगडी येथील गायरान जागेवरील कचरा स्थानांतरण केंद्र मौजे आकुर्डी येथील स. नं. १४७ पै मधील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या सुविधा भुखंडावर बांधणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३१९** **विषय क्रमांक –३१९**

**दिनांक- १८/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१९**<br>**दिनांक-१८/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.क्रीडा/७/कावि/१३४/२०२३ दि.१८/४/२०२३ अन्वये, श्री.शिव छत्रपती स्पोर्टस कॉम्पलेक्स, बालेवाडी, पुणे येथे २१ ते २६ एप्रिल २०२३ मध्ये होणा-या ६ वी जागतीक रोलबॉल स्पर्धेसाठी सह आयोजकत्व घेणेस मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३१९**<br>**दिनांक-१८/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्र.क्रीडा/७/कावि/१३४/२०२३ दि.१८/४/२०२३ अन्वये, महाराष्ट्र रोल बॉल संघटना आणि रोल बॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने आणि केंद्रीय क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचा मान्यतेने ६ वी जागतिक रोलबॉल स्पर्धा २०२३-२४ चे आयोजन दि. २१ ते २६ एप्रिल २०२३ या काळात श्री. शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी पुणे, येथे करणेत आलेले आहे. महाराष्ट्र रोल बॉल संघटना यांनी सदर स्पर्धेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका “६ वी जागतिक रोलबॉल स्पर्धा २०२३-२४” या स्पर्धेचे सह आयोजकत्व स्विकारून अट क्र. १) आर्थिक सहाय्य र.रू ३ लाखापेक्षा जास्त असल्याने यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. २) संघटना महाराष्ट्र रोल बॉल आणि रोल बॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने आणि केंद्रीय क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचा मान्यतेने “६ वी जागतिक रोलबॉल स्पर्धा २०२३-२४” स्पर्धा ही पि.चि.म.न.पा हद्दीबाहेर आहे. या २ अटी शर्ती शिथिल करणेस मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महराष्ट्र रोल बॉल असोसिएशन यांच्याशी करारनामा करून, महराष्ट्र रोल बॉल असोसिएशन यांच्या नावे आर्थिक सहाय्य र.रू २५,००,०००/- (अक्षरी र.रू पंचवीस लाख फक्त) अदा करणेस व सदरचा सदरचा खर्च राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर केलेल्या तरतूद मधून खर्ची टाकणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**